!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३९५ १६/११/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# हिंदूनो जागे व्हा, कायद्याचा लढा अटळ आहे : खासदार चंद्रकांत खैरे

## मुकूंदवाडी मंदिर बचाव समितीची बैठक

**संभाजीनगर (ता.२२) :** मनपाच्या सर्वसाधारण सभेने धार्मीक स्थळांच्या यादीला स्थगिती दिली, त्याबद्दल मनपा पदाधिकारी, नगरसेवकांचे अभिनंदन करतो, आयुक्त सुनिल केंद्रेकर यांनी सकारात्मक भुमिका घेतली आहे, या बाबी धार्मीक स्थळे वाचवण्यासाठी सकारात्मक असल्या तरी न्यायालयात दाखल झालेल्या यादीवर आक्षेप अर्ज दाखल करणे आवश्यक असुन हिंदुना जागे व्हा, गाफील राहु नका, मंदिरे वाचवण्यासाठी कायद्याचा लढा अटळ असल्याचे प्रतिपाद शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

सिडको एन-२, मुंकूदवाडी येथील विठ्ठल मंदिर येथे आज मंदिर बचाव समितीची बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. वारकरी संप्रदाय, भजनी मंडळे यांनी यासाठी पुढाकार घेऊन ट्रस्ट स्थापनेच्या कामात पुढे आले पाहीजे. फक्त पहिली यादी रद्द झाली म्हणुन गप्प बसु नका. मंदिरे तोडण्यासाठी कृती समिती आराखडा करु शकते असा आराखडा शासन धार्मीक स्थळे संरक्षणासाठी का बनवत नाही, याचा जाब सरकारला विचार असल्याचे ही खासदार चंद्रकांत खैरे यावेळी म्हणाले, मंदिरे ही संस्कार केंद्रे आहेत अनेक संप्रदाय हे मंदिरांच्या माध्यमातुन व्यसनमुक्ती साधना, संस्काराची कार्यक्रम करण्यात हिच हिंदूची श्रध्दास्थाने आहेत, त्यांना कोणी हात लाऊ नये त्यासाठी मंदिर अधिकृत करण्याच्या प्रक्रियेत प्रत्येकाने पुढे येऊन काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रशासनाने सुप्रिम कोर्टात यादी दखल केली आहे. त्यासाठी हिंदू म्हणुन एक व्हा आणि आक्षेप दाखल करुन मंदिर बचावसमितीच्या पाठिशी उभे राहुन खासदार चंद्रकांत खैरे यांना या देशातील मंदिरे वाचण्यिासाठी साथ द्या असे आवाहन प्रा. मनोहर धोंडे यांनी केले, लोकमान्यता सिध्दा करावी लागणार त्यासाठी घराघरात जाऊन जागृती करुन स्वाक्षरी मोहीम राबवा असे आवाहन ही त्यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक माजी नगरसेवक बाबासाहेब डांगे यांनी प्रास्ताविक केले. मनोज गांगवे, गणु पांडे, हनुमंत भोंडवे, आचार्य कृष्णकांत महाराज, हभप कडूबा महाराज, अॅड. संदिप राजे भोसले यांनी उपस्थितींना मंदिर विश्वस्तांना मार्गदर्शन केले.

यावेळी नगरसेवक नंदकुमार घोडेले, प्रा. मनोहर धोंडे, नगरसेवक मनोज गांगवे, कमलाकर जगताप, गणु पांडे, हनुमंत भोंडवे, भाऊसाहेब चव्हाण, माजी महापौर सुनंदाताई कोल्हे, दुर्गाताई भाटी, एनबी कुलकर्णी, शिवाजी बनकर, राजु राऊत, सतीष पवार, भागीनाथ रिठे, ज्ञानेश्वर डांगे, विश्वनाथ स्वामी, राजु खरे, साहेबराव घोडके, रुपेश मालाणी, लक्ष्मण पिवळ, सुधीर भाले, भाऊसाहेब राजे, शाहुराव चित्ते, रमेश तारापुरे, गणेश डांगे, देशेटवार अण्णा, दवंडे महाराज, वखरे महाराज, शिंदे महाराज, पुरोहित संघटनेचे सुभाष मुळे, बेंद्रे आप्पा, पदमाती केकाळ, शोभा कुलकर्णी, श्रीमती भापकर, प्रभावती पावरे, हौसाबाई वखरे, उमाकांत शर्मा, मुक्ता सहाणी, सरस्वती बनकर, सुंदर महाराज, राजु शेट्ी, लालचंद यादव, सुभाष चौरसिया, गोविंद धोत्री, सुभवन यादव, राम हरक शर्मा, नमन तिवारी, विजय मिसाळ, दत्तात्रय खजीनकर आदिंसह शेकडो भाविक उपस्थित होते, सदाशिव पुप्पलवार यांनी सुत्रसंचालन केले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**फोटो मेल केला आहे.**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525